संसदेच्या कामात प्रादेशिकतेमूळे अडदाळे निर्माण होत आहे.

५. जागतिकीकरणाच्या दडपणामूळे संसदेतील खासदारावर मर्यादा पडत आहे.

**निष्कर्ष :**

लोकशाहीत्मक विचार हे केवळ शासन प्रणालीबाबतचे नाहीत तर लोकशाही ही एक जीवन पध्दती होय. Way of Life अशा व्यापक अर्दाने लोकशाहीकडे पाहणे आवश्यक आहे. लोकशाहीची पहिली शाळा कुटूंब असून आपण कुटूंबातही वावरतांना लोकशाहीत्मक वर्तन, विचार व वाणी असली पाहिजे. राज्यशास्त्र, कायदाशास्त्र , व लोकप्रशासनाचा शिक्षक या नात्याने आपण परखडपणे भूमिका मांडली पाहिजे. तरच ख-या अर्दाने लोकशाहीचा व संसदेचा पाया भक्कम व मजबुत बनेल.

संसदीय लोकशाही जर मजबुत करायची असेल तर युवा तरूण पिढीला संसदेमध्ये प्रतिनिधित्व दयायला पाहिजे. संसदीय नियमाचा अभ्यास करणारे प्रतिनिधित्व संसदेमध्ये पाठवायला पाहिजे. तरच भारताच्या संसदवर लोकांचा विश्वास बसेल.

**संदर्भ ग्रंदा सुची :-**


१. भारतीय संविधान व शासन व्यवस्दा
प्रा. रा. ज. लोटे

२. भारतीय राज्यघटना
डॉ. दायमा

३. भारतीय संविधान
डॉ. सुभाष गवई

४. भारतीय संविधान व शासन
डॉ. भा. ल. भोळे


❖❖❖

24

# भारतीय लोकशाहीत आरक्षण धोरण व महिला सक्षमीकरण


**निशांत अशोकराव चिकाटे**
नागरी बॅक कॉलनी, वर्धा


**प्रस्तावना :**

भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीस 'एक—व्यक्ती, एक—मत' असा अधिकार मिळाला, यामुळे सर्वांना कायद्याने समान लेखले आहे. आरक्षणाच्या बाबतीत डॉ. बाबासाहेंब आंबेडकरांनी कायदेमंत्री असतांना, आरक्षणामधील पोट कलमाच्या भाषेतच 'सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागासलेले वर्ग' अशी उपसुचना मांडली. या अर्थाने ''विकासाच्या मुख्य प्रवाहापासुन वंचित असणाऱ्या घटकांना इतर सशक्त समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांना कायद्याने देऊ केलेली विशेष संधी म्हणजे 'आरक्षण' होय. तसेच मागासलेल्या घटकाला शासन, प्रशासन आणि न्यायपालिका या लोकशाहीच्या महत्वपूर्ण स्तंभामध्ये प्रतिनिधीत्व देणे म्हणजेचे आरक्षण होय यालाच Principle of Discriminating Equality चा सिध्दांत म्हणतात.

भारतीय राज्यघटनेच्या सरनामा, मुलभूत हक्क, मुलभूत कर्तव्ये व मार्गदर्शक तत्वे यामध्ये 'स्त्री—पुरुष समता' हे तत्व व्यक्त होते. राज्यघटना केवळ महिलांना समतेची शाश्वती देत नाही, तर राज्यसंस्थेने प्रसंगी किंमत मोजुन ही महिलांच्या सार्वजनिक हिताचा विचार केला पाहिजे, अशी भुमिका घेते. यासाठी राज्यसंस्थेला अधिकार राज्यघटना देते. लोकशाही व्यवस्थेच्या चौकटीमध्ये कायदे, विकासाची धोरणे, नियोजन आणि कार्यक्रम यामध्ये महिलांना केंद्रीभुत मानले गेले. महिलांच्या कल्याणाबरोबरच त्यांच्या विकासाकडे सुध्दा लक्ष पुरविण्यात येवु लागले. या पार्श्वभुमिवर महिला

सबलीकरण धोरण भारतात आखले गेले व त्यांची अंमलबजावणी सुरु आहे.

पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असतांना सरकार द्वारा तयार करण्यात आलेल्या पंचायतराज संस्थेशी संबंधीत विधेयक विधेयकाला संशोधित करुन डिसेंबर १९९२ मध्ये अंमलात आले. व १९९३ रोजी ७३ व ७४ वी घटना दुरुस्तीनुसार संविधानामध्ये एक नविन भाग जोडल्या गेले. त्यांचे नाव पंचायतराज असे ठेवण्यात आले. यानुसार कलम २४३ मधील पंचायतराज विषयी सुचना देण्यात आल्या .

गेल्या अठरा वर्षात ग्रामीण भारतातील राजकीय चित्र हळुहळु बदलत आहे. आजवर ज्या ठिकाणी, ज्या जागांवर स्त्रिया क्वचित दिसायच्या अशा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रिया मोठया प्रमाणात दिसत आहे. अर्थात हा बदल आपोआप घडलेला नाही. स्वातंत्र प्राप्तीनंतर ४६ वर्षानी आलेल्या नव्या पंचायतराज कायदयामुळे या बदलाला सुरुवात झाली. व पंचायतराज नुसार महिलांना आरक्षण देण्यात आले. पंचायतराज व ग्रामीण विकास या महत्वाच्या संकल्पना आहे. पंचायतराज साधन तर ग्रामीण विकास सादय आहे. पंचायतराजमुळे महिलांना प्राधान्य मिळाले आहे.

संविधानाच्या **कलम— २४३ (घ) ३ व २४३ (न) ३** नुसार प्रत्येक पंचायत तसेच नगरपालिकामध्ये प्रत्यक्ष निर्वाचित सभासदांच्या एकुण संख्येमध्ये एक तृतीयांश जागा अनुसुचित जाती, जमाती स्त्रियांसाठी आरक्षित आहे. स्त्रियांना स्वराज्य संस्थेमध्ये सहभागी होण्यासाठी विशेष आरक्षणाची तरतुद करण्यात आली आहे. अशारितीने भारतीय संविधानात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्याचबरोबर राजकारणात देखिल महिलांचा सहभाग वाढला. पक्ष पातळीवरही महिलांनी छाप पाडली इत्यादी गोष्टीचे अध यन करणे सुलभ झाले आहे.

**महिलांच्या राजकीय आरक्षणा संदर्भात तरतुदी**

७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीत राखीव जागाचे आरक्षण २४३ घ, न मध्ये पुढील प्रमाणे नमुद आहे.

(१) प्रत्येक पंचायतमध्ये/नगरपालिकेमध्ये (क) अनुसूचित जातीसाठी आणि (ख) अनुसूचित जनजातीसाठी जागा राखुन ठेवण्यात येतील आणि अशा प्रकारे राखुन ठेवण्यात आलेल्या जागांच्या संख्येचे त्या पंचायतीमध्ये थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागाच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे शक्य होईल तिथपर्यंत, त्या पंचायत क्षेत्रामधील अनुसूचित जातीच्या किंवा त्या पंचायत क्षेत्रामधील अनुसूचित जनजातीच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्रातील एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल तेच असेल आणि पंचायतीमधील विविध मतदारसंघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

(२) खंड (१) खाली राखुन ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील एवढया जागा अनुसूचित जातीच्या किंवा यथास्थिती, अनुसूचित जनजातीच्या महिलांसाठी राखुन ठेवण्यात येतील.

(३) प्रत्येक पंचायतीमध्ये थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एक संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कम नसतील एवढ्य जागा (अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जनजातीच्या महिलांसाठी राखुन ठेवलेल्या जागा धरुन) महिलांसाठी राखुन ठेवण्यात येतील आणि पंचायतीमधील विविध मतदार संघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

(४) ग्राम किंवा अन्य कोणत्याही पातळीवरील पंचायतीमधील सभाध्यक्षांची पदे, राज्य विधीमंडळ कायद्याद्वारे तरतुद करील अशा रितीने अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि महिला यांच्यासाठी राखुन ठेवण्यात येतील.

परंतु कोणत्याही राज्यामधील प्रत्येक पातळीवरिल पंचायतीमधील अनुसूचित जाती आणि जमातीसाठी राखुन ठेवलेल्या सभाध्यक्षांच्या पदांच्या संस्थेचे प्रत्येक पातळीवरील पंचायतीमधील अशा पदाच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे शक्य होईल तिथपर्यंत, राज्यामधील अनुसूचित जातीच्या किंवा जमातीच्या लोकसंख्येचे राज्याचे एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्याच प्रमाणाऐवढे असेल. परंतु आणखी असे की, प्रत्येक पातळीवरील पंचयतीमधील सभाध्यक्षांच्या पदांच्या एकूण संख्येच्या एक—तृतीयांशपेक्षा कमी नसतील एवढी पदे महिलांसाठी राखुन ठेवण्यात येतील. तसेच या खंडाखाली राखुन ठेवलेल्या या पदांचे, प्रत्येक पातळीवरील विविध पंचायतमध्ये आळीपाळीने वाटप करण्यात येईल.

(५) खंड (१) आणि (२) खालील जागांचे आरक्षण आणि खंड (४) खालील अध्यक्षांच्या पदांचे आरक्षण हे (महिलांसाठी असलेल्या आरक्षणा व्यतिरिक्त) अनुच्छेद ३३४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधी समाप्त झाल्यावर निष्प्रभावी होईल.

(६) या भागामधील कोणत्याही गोष्टीकडे कोणत्याही राज्याच्या विधानमंडळात मागासवर्गीय नागरीकांसाठी कोणत्याही पंचायतीमध्ये जागा राखुन ठेवण्याकरीता कोणताही उपलब्ध करण्यास प्रतिबंध घेणार नाही.

या घटनादुरुस्तीनुसार कलम २४३ (अ) मध्ये ग्रामसभेची स्थापना करुन त्यांना योग्य ते अधिकार द्यावेत. राज्याच्या विधिमंडळाने या बाबतीत कार्यवाही करावी अशी तरतुद केलेली आहे. परंतु ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे ग्रामसभेच्या रचना, कार्ये व अधिकाराला वैधानिकता प्राप्त झाली आहे, महाराष्ट्र शासनाने महिला ग्रामसभा सुद्धा कायद्याने निर्माण केली आहे.

७३ व्या घटनादुरुस्तीनुसार कलम २४३ मध्ये या तरतुदी ग्रामीण शासन व्यवस्थेसंबंधी करण्यात आलेल्या आहेत. त्या सर्व तरतुदी ७४ व्या घटनादुस्तीत शहरी शासन व्यवस्थेत स्विकारण्यात आलेल्या आहे. त्यामध्ये राखीव जागांचे प्रमाण, शासनव्यवस्थेचा कार्यकाल, उत्पन्नाची साधने राजवित्त आयोग, राज्य निवडणुक आयोग या सर्व तरतुदी शहरी शासन व्यवस्थेत स्विकारण्यात आल्या. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे संपूर्ण भारतात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लाखो स्त्रिया सत्तेत सहभागी होत आहे, भारतीय संविधान — डॉ. बी. आर. आंबेडकर — महाराष्ट्र शासन (२००८).

**आरक्षण धोरण व महिला सक्षमीकरण :**

भारतीय संसदेने आरक्षण विधेयकाला २२ डिसेंबर १९९२ रोजी मान्यता दिली. राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती २४ एप्रिल १९९३ ला अस्तित्वात आली. संपूर्ण भारतात त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था, शहरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार व स्वायतत्ता आणि या सर्व संस्थामध्ये अनुसूचित जाती—जमाती व स्त्रियांना आरक्षण या वैशिष्टयांसह घटनादुरुस्तीचा अंमल सुरु झाला. या घटनादुरुस्तीन्वये त्रिस्तरीय पंचायतीमध्ये व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. हे आरक्षण केवळ सर्वसाधारण जागांसाठीचे नव्हते, तर स्त्रियांसाठी अधिकार पदे राखीव ठेवण्यात आली.

या आरक्षणामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग ३३ टक्के वाढला. महिलांना राजकीय सत्ते मध्ये वाटा मिळाला, परंतु लोकसंख्येच्या प्रमाणा मध्ये हा महिलांचा सहभाग नव्हता. हा सहभाग महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण लागु केले आहे.

ग्रामीण हा शहरी भागातील निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग ग्रामस्वच्छता, दारुबंदी व ग्रामसभा इत्यादी सामाजिक उपक्रम ही मोठया प्रमाणात राबविले जात आहे. आरक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वस, आत्मनिर्भरता वाढत आहे. आरक्षण हे महिला सक्षमीकरणाच्या वाटचालीतील महत्वाचा टप्पा होय. आरक्षणाचा लाभ घेवुन निवडुन आल्यानंतर महिला गावातील विविध प्रश्नाकडे लक्ष देवु लागल्या. गावातील समस्याची चर्चा करु लागल्या, त्यावर उपाययोजना करण्यासंदर्भात प्रत्यक्षात अधिकारी, पदाधिकारी यांच्यापर्यंत पोहचवून समस्याची सोडवणुक करण्याचा प्रयत्न महिला करु लागल्या आहे. थोडक्यात महिलांचे राजकीय सक्षमीकरण आरक्षणामुळे झालेले आहे.

**निष्कर्ष :**

महिला आरक्षणाच्या रुपाने महाराष्ट्रात एका नव्या इतिहासाची मुहुर्तमेढ रोवली गेली आहे महिलांच्या विकास प्रक्रियेला पुरक ठरणाऱ्या आरक्षणामुळे गेल्या दहा वर्षात चांगलाच जोर धरला आहे. आरक्षणांमुळे त्यांना सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जिज्ञासा निर्माण होत आहे. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन अशा राष्ट्रीय कार्यक्रमाकडे बघणारी महिला प्रत्यक्षात ते कार्यक्रम आयोजित करु लागली आहे.एवढेच नव्हे तर गावातील दारुबंदी, रोगनिदान शिबीरे, ग्रामस्वच्छता अभियान, हागणदारी मुक्त गाव अभियान, ग्रामसभा यात आत्मविश्वासाने पुढे येऊन भाग घेत आहे.

**सुचना :**

१) महिलांच्या सामाजिक व राजकीय सक्षमीकरणाकरीता जिल्हा, तालुका स्तरावर पंचायतराज प्रशिक्षण, मार्गदर्शन केंद्र व महिला सक्षमीकरणाची

माहिती पुरविणारे संचालनालय असावे. जेथे महिलांची सर्व साधारण माहिती सांख्यिकी उपलब्ध असु शकेल.

२) राजकीय पक्षांनी आपल्या घटनेत दुरुस्ती करुन स्त्रियांसाठी ५० टक्के जागा राखुन ठेवण्यात आल्या आहेत. हयामुळे पक्षसंघटनेतील तसेच निवडणुक प्रक्रियेतील सर्व निर्णयबाबतच्या बारकाव्याचे स्त्रियांना आकलन होऊन स्त्रियांच्या राजकीय सक्षमीकरणाची प्रक्रिया गतीशील होईल.

३) राजकीय पक्षांनी सातत्याने स्त्रियांसाठी शिबीरे, मेळावे, प्रशिक्षण, गटचर्चा आयोजित करावयास पाहिजे. त्यासाठी महिला आघाडीतील स्त्री कार्यकर्त्यांनी आणि स्त्री प्रतिनिधींनी पुढाकार घ्यावयास पाहिजे. त्यामुळे पक्षस्तरावरील निवड प्रक्रियेत असलेले पुरुषांचे वर्चस्व कमी होईल.

४) आरक्षणामुळे सामान्य स्त्रिया सुध्दा आमदार, खासदार बनुन कायदेमंडळातील निर्णय प्रक्रियेत सहभागी होईल. त्यातून त्यांचे राजकीय सक्षमीकरण होईल. म्हणून महिलांना लोकसभा व विधानसभा मध्ये आरक्षण मिळणे आवश्यक आहे.

५) कायदेशीर मोजमापासोबत येथे समाजकार्यकर्त्याच्या मध्यस्थीची आवश्यकता आहे. महिलांचे सक्षमीकरण व सामाजिक व राजकीय सहभागासाठी करण्यापूरतीच नाही. तर महिलांना कल्याणाच्या सेवा मिळवून देण्यासाठी आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. आंबेडकर, बाबासाहेब; (२००१) भारतीय संविधान, मुंबई : महाराष्ट्र शासन

२. कुलकर्णी, बी.वाय.; (२००३) भारताचे शासन आणि राजकारण, नागपूर : श्रीविद्या प्रकाशन

३. गावनकार, रोहीणी ; (१९८६) मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रूप, पुणे : आदित्य प्रकाशन

४. देशमुख, अल्का ; (२००७) भारतीय शासन आणि राजकारण, नागपूर : श्रीविद्या प्रकाशन

५. पवार, दिपक ; (२००९) महिलांचे राजकीय सक्षमीकरण, नागपूर : श्रीसाईनाथ प्रकाशन

६. पवार, वैशाली ; (२०१२) महिलांच्या सत्ता संघर्षाचा आलेख, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स

७. फडके, य. दी ; (२००६) राखीव जागांची शंभर वर्षे, पुणे : सुगावा प्रकाशन


**25**

# महात्मा गांधीजींचे महिला विषयक विचार


**प्रा.डॉ.राजू सिताराम पवार**
संरक्षणशास्त्र विभाग प्रमुख
आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
शिरपूर जि. धुळे


**********

भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार व्यक्तिस्वातंत्र्यवादी दृष्टीकोनातून करतांना असे लक्षात येते की भारतीय स्त्रियांवर या दोन्ही संकल्पनामुळे प्रचंड अन्याय, अत्याचार झाले आहेत. त्यामुळे स्त्रियांविषयी गांधीजींची भूमिका नेमकी कशी होती हे समजून घेतांना त्यांच्या विचारातील काही अंतर्विरोध समोर येतात.

१९२० नंतर भारतीय राजकारणात गांधीजींचा प्रवेश झाला आणि अल्पावधीतच भारतीय राजकारणातील एक प्रभावशाली व्यक्ती म्हणून ते ओळखले जाऊ लागले. १९२० नंतर भारतीय राजकारण, धर्म, संस्कृती, समाजकारण यावर गांधीजींचा प्रभाव आढळतो. गांधीजी हे सनातनी हिंदू आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. हिंदु धर्म संकल्पनेची चौकट बळकट करण्यासाठी गांधीजी प्रयत्नशील होते. राजकारण, धर्मकारण, आणि समाजकारण यांचे ऐक्य गांधीजींच्या कार्यशैलीत आढळते आणि असे उच्चतर राजकारण त्यांनी समाजाच्या जीवनशैलीचा भाग बनावे असे उदात्त स्वप्न बघितले. मुळात हिंदू धर्म परंपरेचा विकास साधतांना गांधीजींनी सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद रूजविण्याचा प्रयत्न केला आणि याच दृष्टीकोनातून भारतीय स्त्रिया आणि उपेक्षितांचा त्यांनी विचार केला. स्त्रिया आणि उपेक्षित यांना आपले मानवी अधिकार मिळावेत यासाठी ते प्रयत्नशील होते. राजकारण आणि धर्म यांची फारकत होणे आवश्यक आहे असे मत गांधीजींनी मांडले आहे. एकीकडे धर्म आणि राजकारण यांची फारकत ते अपेक्षिततात तर दुसरीकडे धर्माचा आधार घेऊन राजकारणातील सुत्रे हलवतात. गांधी विचारातील हा विरोधाभास लक्षात घेण्यासारखा आहे.